विनोदवीर राजू श्रीवास्तव यांच्या निधनाने कला क्षेत्रातील तारा निखळला

-सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

मुंबई, दि. 21: आपल्या वेगळया देहबोलीतून आणि आपल्या विनोदातून सर्वांचे मनोरंजन करणाऱ्या आणि किंग ऑफ कॉमेडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजू श्रीवास्तव यांच्या निधनाने कला क्षेत्रातील एक तारा निखळला असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

श्री. मुनगंटीवार म्हणतात की, कलाकार राजू श्रीवास्तव आपल्या हृदयात हक्काचे स्थान निर्माण करणाऱ्या विनोदी यांच्या निधनाची बातमी अत्यंत दु:खद आहे. आपल्या सहजसुंदर अभिनय आणि विनोदी शैलीमुळे ते घराघरात प्रसिध्द झाले. स्टेज शोजपासून सुरुवात करणाऱ्या राजू यांनी अनेक मालिका आणि चित्रपटांमध्ये काम केले होते. राजू श्रीवास्तव यांच्या कॉमिक टायमिंगला प्रेक्षकांची पसंती मिळत होती. गेल्या काही दिवसांपासून ते दिल्लीतील इस्पितळात उपचार घेत होते मात्र आज त्यांच्या निधनाची बातमी ही अत्यंत क्लेशदायक आहे. त्यांच्या कुटुंबियांना हे दु:ख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.